**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१८३६/२०२५**
**निशाणी क्रमांकः– १३ खाली**
**विशाल म्हात्रे व इ. वि. कोणीही नाही.**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची शपथेवरील जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नावः– विशाल रमेश म्हात्रे

**सरतपास अर्जदार तर्फे वकील श्री. आर. के. पाटील यांचे मार्फत सुरू**

**०१.** सदर प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे व तो बरोबर आहे व तो वाचल्यानंतर मी त्यावर सही केली. माझ्या आई व वडिल यांच्या मृत्यूच्या दाखल्याच्या झेरॉक्स प्रती मी दाखल केलेल्या आहेत व मुळ प्रती सोबत आणल्या आहेत. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिल्या त्या बरोबर आहेत. झेरॉक्सला **नि.१५ व १६** देण्यात येत आहे. माझ्या आई व वडिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या नोदणीकृत करारनामा क्र.२००३/२०१८ ची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१७** देण्यात येत आहे. माझ्या आई व वडिलांच्या नावावर असलेल्या कोपरोली येथील मालमत्तेच्या कर आकारणी नोंद वहीची प्रमाणित प्रत मी दाखल केली आहे त्यास **नि.१८** देण्यात येत आहे.

**०२.** दैनिक किल्ले रायगड या पेपरमध्ये दि.१६/०१/२०२६ रोजी जाहिर नोटीस प्रकाशित केली होती तो पेपर मी दाखल केलेला आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.03.25 16:07:00 +0530

**ठिकाणः पनवेल** **(आर. वाय.खंडारे)**
**दिनांकः– २५/०३/२०२६.** **५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल**